म्हाडा MHADA

**महाराष्ट्र शासन (गृहनिर्माण विभाग)**

**नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नाशिक**

(महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा विभागीय घटक

# सदनिका विक्रीची जाहिरात - फेब्रुवारी २०१९(विक्री किंमतीत विशेष सुट देवून)

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम-१९७६ च्या अंतर्गत (भू-विनियोग) नियम -१९८१ आणि (मालमत्ता व्यवस्थापन गाळयांची विक्री, हस्तांतरण आणि अदलाबदल) विनियम-१९८२ अन्वये व त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणांच्या अधिन राहून नाशिक, श्रीरामपूर, जि.अहमदनगर व धुळे येथील सदनिकांची एक रकमी पध्दतीनेव आहे त्या स्थितीत विक्रीची जाहिरात नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रवकास मंडळातर्फे घोषित करण्यात येत आहे.

## अर्जदाराची नोंदणी, ऑनलाईन अर्ज भरणे व स्विकृती वेळापत्रक

**(१)** अर्जदारांची नोंदणी आणि अर्ज सादर करण्याचा **दिनांक २७/०२/२०१९** दुपारी २.०० वा. पासून ते **दिनांक २२/०३/२०१९** रात्री ११.५९ वा. पर्यंत. **(२)** एनईएफटी/ आरटीजीएस व्दारे पेमेंट तारीख **२७/०२/२०१९** ते **२४/०३/२०१९** (संबंधित बँकेच्या कामकाजाच्या दिवशी आणि वेळी) **(३)** डेबिट कार्ड / क्रेडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग स्वीकृती तारीख आणि वेळ : **२७/०२/२०१९** रोजी २.०० वा.पासून ते **२४/०३/२०१९** रोजी २३.५९ वा. पर्यत. **(४)** प्रस्तावित सोडतीचा **दिनांक ०३/०४/२०१९** सकाळी १०.०० वाजता.

## ऑनलाईन अर्ज शुल्क रुपये ३३६/- (अर्ज शुल्क रुपये ३००/- + जी.एस.टी. @१२ % रुपये ३६/- विना-परतावा)

| अनु. क्र. | योजनेचा संकेत क्रमांक | योजनेचे नांव | सदनिकेचे वर्णन | योजनेची वैशिष्टे | उत्पन्न गट | सदनिकेची अंदाजित किंमत | अनामत रक्कम + अर्ज शुल्क रु.३००/- +जी.एस.टी. @१२% रु.३६/- | सदनिकेचे चटई क्षेत्रफळ (चौ.मी.) | सदनिकेचे बांधकाम क्षेत्रफळ (चौ.मी.) | एकूण सदनिका | आरक्षण गटनिहाय उपलब्ध सदनिका | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | अनुसूचित जाती आणि नवबौध्द | अनुसूचित जमाती | भटक्या जमाती | विमुक्त जाती | सर्वसाधारण जनता |
| १) | १०१ | गट नं.६०९ आडगांव म्हसरुळ लिंक रोड डॉ.वसंत पवार मेडीकल कॉजेलजवळ, आडगांव नाशिक | १ बीएचके | बैठक खोली (बाल्कनीसह), १ शयनकक्ष, स्वयंपाकगृह, एक स्वतंत्र टॉयलेट व बाथरुम, ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स. | अत्यल्प | ८१९५१०/- | ५३३६/- | २८.११ | ४२.५९ | १८९ | २० | ११ | ३ | २ | १५३ |
| २) | १०२ | बोरावके नगरजवळ, डॉ.अनारसे हॉस्पिटलमागे, श्रीरामपूर, जि. अहमदनगर | १ आरके | बैठक खोली, स्वयंपाकगृह, एक स्वतंत्र टॉयलेट व बाथरुम, ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स. | अत्यल्प | ६०००००/- | ५३३६/- | २०.६० | २८.७१ | ४ | १ | १ | ० | ० | २ |
| ३) | २०१ | गट नं.६०९ आडगांव म्हसरुळ | १ | बैठक खोली (बाल्कनीसह), १ | अल्प | १३८६६६३/- | १०३३६/- | ४४.४२ | ७२.०७ | ११२ | १२ | ६ | २ | १ | ९१ |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लिंक रोड डॉ.वसंत पवार मेडीकल कॉजेलजवळ, आडगांव नाशिक | बीएचके | शयनकक्ष, स्वयंपाकगृह, एक स्वतंत्र टॉयलेट व बाथरुम,ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स. | | | | | | | | | | | |
| ४) | २०२ | बोरावके नगरजवळ, डॉ.अनारसे हॉस्पिटल मागे, श्रीरामपूर, जि. अहमदनगर | १ बीएचके | बैठक खोली, १ शयनकक्ष, स्वयंपाकगृह, स्वतंत्र टॉयलेट व बाथरुम, ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स | अल्प | ७२५०००/- | १०३३६/- | २८.०२ | ३८.९५ | १५७ | १४ | १० | ३ | ३ | १२७ |
| ५) | २०३ | सर्व्हे नं.४३/२ब/२ व ४३/ब/१अ/२ राजराजेश्वरी मंगलकार्यालयामागे, रेल्वे लाईनजवळ, पंचक, नाशिक | १ बीएचके | बैठक खोली (बाल्कनीसह), एक शयन कक्ष, स्वयंपाक गृह व एक स्वतंत्र टॉयलेट व बाथरुम, ग्रिलसह ॲल्युमिनियम स्लायडींग खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स इ. | अल्प | १३०००००/- | १०३३६/- | ४४.८९ | ७२.४७ | १४० | १५ | ८ | २ | २ | ११३ |
| ६) | ३०१ | गट नं.६०९ आडगांव म्हसरुळ लिंक रोड डॉ.वसंत पवार मेडीकल कॉजेलजवळ, आडगांव नाशिक | २ बीएचके | बैठक खोली (बाल्कनीसह), २ शयनकक्ष, (एकास अटॅच टॉयलेट) स्वयंपाकगृह,१ स्वतंत्र अटॅच टॉयलेट व बाथरुम , ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स | मध्यम | १९६१६५९/- | १५३३६/- | ५८.९५ | ९०.०९ | ११२ | १२ | ६ | २ | १ | ९१ |
| ७) | ३०२ | सर्व्हे नं.३०९/४अ,४ब,४क अंजना लॉन्स जवळ, जी.डी.सावंत कॉलेजसमोर, पाथर्डी शिवार, नाशिक | १ बीएचके | बैठक खोली, (बाल्कनीसह), एक शयन कक्ष, स्वयंपाकगृह, एक स्वतंत्र टॉयलेट व बाथरुम, ग्रिलसह ॲल्युमिनियम स्लायडींग खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स इ. | मध्यम | १५९६०००/- | १५३३६/- | ४८.८६ | ७०.३२ | १२ | २ | १ | ० | ० | ९ |
| ८) | ३०३ | सर्व्हे नं.३०९/४अ,४ब,४क अंजना लॉन्स जवळ, जी.डी.सावंत कॉलेजसमोर, पाथर्डी शिवार, नाशिक | २ बीएचके | बैठक खोली (बाल्कनीसह), दोन शयन कक्ष (एकास अटॅच टॉयलेट), स्वयंपाक गृह व एक स्वतंत्र टॉयलेट व बाथरुम, ग्रिलसह ॲल्युमिनियम स्लायडींग खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स इ. | मध्यम | २३०६४००/- | १५३३६/- | ७०.६८ | १०१.७३ | १८४ | १९ | ११ | ३ | ३ | १४८ |
| ९) | ३०४ | सर्व्हे नं.३१९/१ब/२ मुरलीधर नगर, साईबाबा मंदिराजवळ, पाथर्डी शिवार, नाशिक | २ बीएचके | बैठक खोली (बाल्कनीसह), दोन शयन कक्ष (एकास अटॅच टॉयलेट), स्वयंपाक गृह व एक | मध्यम | २३२६४००/- | १५३३६/- | ७०.६८ | १०२.६७ | ३९ | ३ | २ | १ | १ | ३२ |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | स्वतंत्र टॉयलेट व बाथरुम, ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स इ. | | | | | | | | | | | |
| १०) | ३०५ | गट नं.४४८/५+६, आर.टी.ओ.ऑफीस समोर, कृषि उत्पन्न बाजार समितीजवळ,मखमलाबाद,नाशिक | २ बीएचके | बैठक खोली (बाल्कनीसह), २ शयनकक्ष, (एकास अटॅच टॉयलेट) स्वयंपाकगृह,१ स्वतंत्र अटॅच टॉयलेट व बाथरुम, ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स | मध्यम | २१०२०००/- | १५३३६/- | ६३.५१ | ९५.१९ | ११२ | १२ | ६ | १ | २ | ९१ |
| ११) | ३०६ | सर्व्हे नं.२१७/४अ आकाश पेट्रोल पंपामागे, प्रजापिता ब्रह्मकुमारी सेवा केंद्राजवळ,कलानगर, म्हसरुळ, नाशिक | २ बीएचके | बैठक खोली (बाल्कनीसह), २ शयनकक्ष, (एकास अटॅच टॉयलेट) स्वयंपाकगृह,१ स्वतंत्र अटॅच टॉयलेट व बाथरुम, ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स | मध्यम | २१५६०००/- | १५३३६/- | ६३.५० | ९६.५२ | ३६ | ४ | ० | १ | १ | ३० |
| १२) | ३०७ | सर्व्हे नं.२१७/४अ आकाश पेट्रोल पंपामागे, प्रजापिता ब्रह्मकुमारी सेवा केंद्राजवळ,कलानगर, म्हसरुळ, नाशिक | १ बीएचके | बैठक खोली (बाल्कनीसह), १ शयनकक्ष, स्वयंपाकगृह, एक स्वतंत्र टॉयलेट व बाथरुम,ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स. | मध्यम | १३८६५८७/- | १५३३६/- | ४६.०० | ६९.९२ | १२ | ० | १ | १ | ० | १० |
| १३) | ३०८ | सर्व्हे नं. ४६५/२ चाळीसगांव रोड, धुळे | १ बीएचके | दिवाण खोली, स्वयंपाक खोली, शयन खोली, दोन बाल्कनी, शौचालय व बाथरुमसह | मध्यम | १०२२१९७/- | १५३३६/- | ४८.५३ | ६५.५१ | २२ | २ | २ | १ | ० | १७ |
| १४) | ३०९ | सर्व्हे नं. ४६५/२ चाळीसगांव रोड, धुळे | १ बीएचके | दिवाण खोली, स्वयंपाक खोली, शयन खोली, दोन बाल्कनी, शौचालय व बाथरुमसह. | मध्यम | ९९२२४६/- | १५३३६/- | ४४.०७ | ५९.५० | २ | १ | ० | ० | ० | १ |

## पात्रता निकष

१. अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

२. जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून महाराष्ट्रातील मागील सलग २० वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये अर्जदाराने किमान १५ वर्षाचे वास्तव्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) /रहिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. (केंद्र शासन कर्मचारी (CG), प्रवर्ग-आरक्षण वगळून).

३. अर्ज सादर करतांना अर्जदाराचे स्वत:चे नावे बँक खाते / क्रमांक असणे आवश्यक आहे. दुस-याचे, एन.आर.आय., चालू खाते तसेच संयुक्त बँक खाते क्रमांक वापरता येणार नाही. या अटीचा भंग केल्यास असे अर्ज रद्द करण्यात येतील.

४. अर्जदाराचे स्वत:चे पॅनकार्ड असणे आवश्यक आहे. पात्रतेसाठीच्या इतर अटी व शर्तीचा उल्लेख तसेच आरक्षण गटाचे विवरण इ. माहिती पुस्तिकेत विस्तृतपणे स्पष्ट करण्यात आली आहे. सर्व अर्जदारांनी माहिती पुस्तिकेचा सखोल अभ्यास अर्ज भरण्यापूर्वी करावा. माहिती पुस्तिका व अर्ज म्हाडाच्या ऑनलाईन अर्ज भरण्याचे संकेतस्थळ https://lottery.mhada.gov.in वर उपलब्ध राहील.

५. प्रत्येक प्रवर्गाच्या पात्रतेसंबंधी तपशीलवार माहिती संकेतस्थळावर जारी केलेल्या ''माहिती पुस्तिकेत'' देण्यात आली आहे.

## ऑनलाईन अर्ज भरावयाची पध्दत

**सोडत २०१९ साठी अर्ज भरण्याची पध्दत खालीलप्रमाणे आहे :**

**टप्पा क्र. १ : अर्जदारांची नोंदणी**

✸अर्जदाराने प्रथम https://lottery.mhada.gov.in या संकेत स्थळास भेट द्यावी.

✸सर्वप्रथम अर्जदाराने स्वतःचे USER NAME नोंदणी करावे. हा USER NAME कायम लक्षात ठेवावा. अर्जदाराने नोंदणी करण्यासाठी खालील बाबीची माहिती तयार ठेवावी.

१) स्वतःचे नांव, २) अर्जदाराचे फोटे(स्कॅन केलेले स्वतःचे सुस्पष्ट पासपोर्ट आकरातील रंगीत व ठळक छायाचित्र असावे व ते ५० केबी पर्यत JPG format मध्ये असावे). ३) पॅनकार्डचे तपशिल (पॅन क्रमांकाचे ऑनलाईन व्हेरिफिकेशन केले जाईल)४) जन्मतारीख (पॅनकार्ड प्रमाणे), ५) व्यवसाय, ६) वैवाहिक स्थिती, ७) लिंग ८) राहण्याचा पत्ता ९) स्वतःचा भ्रमणध्वनी क्रमांक (शुन्यापासून सुरु करु नये) १०) ई-मेल आयडी (टिपः सर्व कम्यूनिकेशन हे ई-मेल व एसएमएस व्दारे करण्यात येणार असल्यामुळे ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक भरतांना काळजी घेणे आवश्यक आहे. ११) अर्जदाराचा बँक खात्याचा रद्द केलेला धनादेश(cheque) स्कॅन करावा.

**टप्पा क्र.२ : सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज भरणे :-**

- वरील टप्पा १ नुसार नोंदणी केल्यानंतर नोंदीत अर्जदारास युजर नेम व पासवर्डचा वापर करुन लॉगइन करता येईल. नोंदणी करतांना दिलेल्या माहिती अन्वयेअर्ज करता येईल.
- अर्जदार नोंदणी करतेवेळी दिलेली माहिती SUBMITकरेपर्यंत EDITकरता येईल, तसे ते पाहता सुध्दा येईल.
- योजनेकरिता अर्ज करतांना APPLY FOR LOTTERY या लिंक वर क्लिक करावे, असे केल्यानंतर अर्जदारास उत्पन्न गटानुसार अर्ज करावयाचे विविध योजना संकेत क्रमांकाची माहिती दिसेल.
- यानंतर अर्जदाराला APPLICATION FOR RESIDENTIAL ACCOMMODATION FORM दिसेल. सदर फॉर्म भरतांना अर्जदारास योजना संकेत क्रमांक, प्रवर्ग, रकमेचा भरणा करण्याची पध्दत इत्यादी माहितीसह इतर माहिती भरावयाची आहे. **(टिप : नोंदणी फॉर्ममधील सर्व माहिती RESIDENTIAL ACCOMMODATION FORM मध्ये आपोआप दिसेल)**
- वरील सर्व माहिती भरल्यानंतर SUBMITया बटनावर क्लिक करावे. बदल करावयाचे नसल्यास निश्चित CONFIRMया बटनावर क्लिक करावे. त्यानंतर तळाशी प्रिंट अक्नॉलेजमेंट इन इंग्लिश व प्रिंट अक्नॉलेजमेंट इन मराठी या पैकी अर्जदाराने योग्य पर्याय निवडून तेथे क्लिक केल्यास अर्जदाराने भरलेल्या अर्जाची एडिट न करता येणारी पीडीएफ (PDF) च्या स्वरुपात फाईल स्क्रिनवर दिसेल त्यावर १० अंकी अर्ज क्रमांक दिसेल. ही पीडीएफ (PDF) फाईल अर्जदार कुठेही सेव्ह करु शकतो व त्याची प्रिंट आऊट घेवू शकतो.

**टप्पा क्र.३ : अनामत रक्कम भरण्याची पध्दत :-**

**चारपैकी कोणत्याही पध्दतीव्दारे अनामत रक्कम जमा केली जाऊ शकते**

(१) डेबिट/क्रेडिट कार्ड (२) इंटरनेट बँकिंग (३) एनईएफटी/आरटीजीएस

१. NEFT/RTGS व्दारे अनामत रक्कमेचा भरणा करण्याची पध्दती. २.१ NEFT/RTGSअर्जदाराच्या बँक खात्यामधून बँकेमार्फत करण्याची पध्दती - Generate Slip घेवून अर्जदाराने स्वतःचे खाते असलेल्या बँकेत जावून Generate Slipवर दिलेल्या खाते क्रमांक, बँकेचे नांव, बेनेफिशिअरी नांव, शाखेचे नांव व IFS Code अचूक माहिती टाकून NEFT/RTGS करावे. २.२ NEFT/RTGS स्वतःच्या बँक खात्यामधून Internet Bankingव्दारे करण्याची पध्दत - सर्व प्रथम अर्जदाराने Internet Banking चे लॉगईन करुन Add Beneficiaryवर क्लिक करुन Generate Slip वरील माहिती जसे Branch Name , Bank Name, Beneficiary Name, Beneficiary Account Numberव IFS Codeने Bank Account Add करावे व दिलेल्या रक्कमेचा भरणा करावा. **टिप : अर्जदाराने खाते क्रमांक टाकतांना अचूकता ठेवावी किंवा दिलेल्या माहितीची पुन्हा पुन्हा शहानिशा करावी.**

२. ऑनलाईन /फ्रि चार्ज ॲप व्दारे पेमेंट केल्यास सर्व्हिस प्रोव्हायडरने ठरविलेले शुल्क अर्जदारास अदा करावे लागेल. त्याची माहिती सॉफ्टवेअरमध्ये उपलब्ध आहे.

३. एकदा नोंदणी केल्यानंतर त्या अकांऊटव्दारे अर्जदार एकापेक्षा जास्त प्रवर्ग / योजनेसाठी पात्र असल्यास त्याला एकापेक्षा जास्त अर्ज भरता येईल.

४. ऑनलाईन पेमेंट करतांना काही वेळेस तांत्रिक अडचणीमुळे अनामत रक्कम मंडळाच्या खात्यावर जमा न झाल्यास व पुन्हा "दुबार" प्रयत्न करतांना एका अर्जासाठी दोन वेळा अनामत रक्कम मंडळाच्या खात्यावर जमा झाल्यास याबाबत त्वरीत उपमुख्य अधिकारी/नाशिक मंडळ यांना उपरोक्त नमूद केलेल्या पत्त्यावर संपर्क करावा. अशा प्रकारे दुबार भरणा केलेल्या रक्कमेचा परतावा सोडतीनंतर करण्यात येईल.

५. ऑनलाईन पेमेंट करतांना काही तांत्रिक अडचणीमुळे अनामत रक्कम मंडळाच्या खात्यावर जमा न झाल्यास त्यास मंडळ जबाबदार राहणार नाही.
६. **अर्जामध्ये विचारलेली माहिती अर्जदाराने जाणून बुजून अथवा अनावधाने चुकीची दिल्याचे अर्ज तपासणीमध्ये आढळल्यास असे अर्ज रद्द ठरविण्यात येतील.**

## विशेष सूचना

१. सदर योजनेतील वितरणांस, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळयांची वक्री व हस्तांतरण आणि अदलाबदल) विनिमय, १९८१ आणि म्हाड (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ यामधील तरतुदी जशाच्या तशा (वेळोवेळी होणा-या सुधारणांसह) लागू राहतील.
२. **नियोजित प्रकल्पातील योजनांचे चटई क्षेत्रफळ, विक्री किंमत व सदनिकांची संख्या अंदाजित असून त्यामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.**
३. **सदनिकेच्या किंमती व्यतिरिक्त ३० वर्षाचे भुईभाडे व अकृषिक कराची भांडवलीकरण करून येणारी रक्कम व त्यावरी नियमाप्रमाणे जी.एस.टी.ची रक्कम भरल्यानंतर सदनिका वाटप करण्यात येईल.**
४. **सदनिकांच्या वितरणासाठी कोणालाही म्हाडाने प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तीशी परस्पर व्यवहार करु नये, तसे केल्यास नाशिक मंडळ / म्हाडा कोणत्याही व्यवहारास / फसवणुकीस जबाबदार राहणार नाही.**
५. यशस्वी अर्जदार पात्र ठरल्यास अशा लाभार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार आवश्यक मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क अदा करावे लागेल. मुद्रांक शुल्क व वरीलप्रमाणे लागू असणारे कर भरणा केल्यानंतरच सदनिकेचे प्रत्यक्ष वितरण करण्यांत येईल.
६. मंडळाने सदनिका वितरणाचे देकारपत्र दिल्यानंतर लाभार्थ्याने आपला अर्ज मागे घेतल्यास अर्जासोबत भरलेल्या अनामत रक्कमेतून सदनिकेच्या किंमतीच्या १% रक्कम कपात करण्यात येईल. तथापि अर्जदाराने आपला अर्ज देकारपत्र देण्यापुर्वी मागे घेतल्यास अनामत रक्कमेतून रूपये १०००/- प्रशासकीय खर्च वजा करून उर्वरीत रक्कम बिन व्याजी परत करण्यात येईल. अनामत रकमेवर कोणतेही व्याज देय नाही.
७. संगणकीय सोडतीत कोणत्याही प्रकारे मानवी हस्तक्षेप होवू शकत नाही. याकरीता अर्जदारांना सूचित करण्यात येते की, अशा प्रकारच्या कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.
८. या योजनांतर्गत आलेला कोणताही अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचा किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचा अधिकार मा. मुख्य अधिकारी/नाशिक मंडळ यांनी राखून ठेवला आहे.
९. जाहिरात व सोडतीच्या अनुषंगाने काही नवीन सूचना असल्यास www.mhada.maharashtra.gov.in तसेच https://lottery.mhada.gov.inया संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील.
१०. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जातीच्या प्रवर्गातील लाभार्थींना जातवैधता पडताळणी प्रमाणपत्र तसेच सत्यपित अहवाल सोडतीच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जमातीच्या प्रवर्गातील लाभार्थींना सदनिकेचा ताबा दिला जाणार नाही.
११. बांधकाम पूर्ण झालेल्या सदनिका जशा आहेत तशा स्थितीमध्ये तथापि त्या राहण्यायोग्य करुन वितरीत करण्यात येतील.
१२. जाहिरातीमध्ये अनवधानाने झालेल्या छपाईच्या चुकांचा कोणत्याही प्रकारे अर्जदारास फायदा घेता येणार नाही.

## विशेष सुचना :-

**१) लाभार्थ्यांचे भारतातील प्रथम घर असल्यास प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत CREDIT LINK SUBSIDY बँकेव्दारे आपणास लाभ घेता येवू शकतो.**

**२) उत्पन्न मर्यादा शिथिल (काढून टाकण्यात आलेली असल्याने) एक युजर आयडी वापरुन एका पेक्षा जास्त सदनिकांसाठी अर्जदार अर्ज करु शकतो.**

**माहितीपुस्तिका व अर्जाचा नमूना दिनांक २७/०२/२०१९ पासून संकेतस्थळांवर उपलब्ध होईल.**
**अधिक माहितीसाठी संपर्क : म्हाडा लॉटरी मदत केंद्र नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, रामगणेश गडकरी चौक, नाशिक-४२२००२**

म्हाडाचे ऑनलाईन अर्जाकरीता संकेतस्थळ : https://lottery.mhada.gov.in Email: emmhadansk@gmail.com हेल्पलाईन नं. 9869988000, 022-26592692, 022-26592693

**सही/-**
**रमेश मिसाळ, मुख्य अधिकारी**
**नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नाशिक**